# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## २७/०४/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२९) इतिवृत्त

मंगळवार, दिनांक २७/४/२०१० रोजी मा.सभापती **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी १२.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म.), नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०२. श्री.जावेद हसन खान
०३. श्री.विनायक पांडे
०४. श्रीमती मेहरून्नीसा खान
05. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**संवाद :**

श्रीमती मेहरून्निसा खान : राजस्थानच्या राज्यपाल मा.श्रीमती प्रभा राव यांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : सहयोगी नगरसेविका यास्मीन बेगम यांचे पतीचे निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमीन : अनुमोदन आहे.

मा.सभापती : राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्र राज्याच्या काँग्रेस पक्षाच्या माजी अध्यक्ष श्रीमती प्रभा राव तसेच नगरसेविका यास्मीन बेगम यांचे पती अक्रम खान यांना श्रध्दांजली वाहण्याची स.सदस्यांनी केलेली सुचना मान्य करण्यात येते. सभागृहाच्या वतीने दोन मिनटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी.

(सभागृहाच्या वतीने 2 मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**विषय क्र. ४७७ :**

दिनांक २९/१२/२००९(का.प.क्र.२०), ०६/०१/२०१०(का.प.क्र.२१), २२/०१/२०१०(तहकूब), दि.२९/०१/२०१०(का.प.क्र.२२), दि.२९/०१/२०१०(का.प.क्र.२३), दि.०६/०२/२०१०(तहकूब), दि.१०/०२/२०१०(तहकूब), दिनांक ११/०२/२०१० (का.प.क्र.२४), १५/०२/२०१०(का.प.क्र.२५) आणि २०/०२/२०१०(का.प.क्र.२६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : विषय क्र.477 स्थायी समिती इतिवृत्त 11.02.2010 मध्ये विषय क्रमांक 360 मध्ये सर्व्हे नं. 68 मध्ये इतर संस्थाना/नागरीकांना रूपये 1000/-प्रमाणे हॉलचे भाडे लावले त्याप्रमाणे त्यांनाही 1000/- रूपये भाडे लावण्यात यावेत. |
| मा.सभापती | : विषय क्रमांक 360 मध्ये भाडे सुधारित करून 1000/- रूपये भाडे लावण्यात येते. |

**ठराव :**

दिनांक ११/२/२०१० रोजीच्या सभेतील विषय क्र.३६० सर्व्हे नं.६८ संत तुकोबा नगर एन-२ सिडको येथील महानगरपालिका मालकीचे सभागृह अभ्यासिका आणि वाचनालयासाठी रक्कम रू.१०००/- प्रती प्रतिमाह भाडे आकारणी करकरणे, या व इतर दुरूस्त्यांसह दिनांक २९/१२/२००९, ०६/०१/२०१०, २२/०१/२०१०(तहकूब), दि.२९/०१/२०१०, दि.२९/०१/२०१०, दि.०६/०२/२०१०(तहकूब), दि.१०/०२/२०१०(तहकूब), दिनांक ११/०२/२०१०, १५/०२/२०१० आणि २०/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.विनायक पांडे | : दिनांक 26.02.2010 रोजी संपन्न झालेली स्थायी समितीचा ठराव क्रमांक 454 दुरूस्ती करून रू.1000/- भाडे आकारण्यात यावे. |
| मा.सभापती | : ऐनवेळी आलेले प्रस्ताव वाचुन दाखविण्यात यावे. ऐनवेळचे प्रस्तावांस मंजुरी देण्यात येते. |

**विषय क्र. ४७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाने नॅशनल लेक कॉन्झर्वेशन प्लॅन व नॅशनल रिव्हर कॉन्झर्वेशन प्लॅन हे कार्यक्रम हाती घेतले असून, या कार्यक्रमांतर्गत भारतातील नद्यांचे व तलावांचे पुढील भविष्यासाठी संवर्धन व सौंदर्यीकरण करून ते पर्यटन केंद्र म्हणुन विकसीत करणे आदी केंद्र शासनाचे उद्देश आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान स्वरूपात निधी उपलब्ध होणार असून, तो प्रकल्प खर्चाचया ७० टक्के केंद्र शासन अनुदान आणि उर्वरीत ३० टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग असा वित्तीय आकृतीबंध आहे. या अनुषंगाने खालील प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता, दिनांक २०.२.२०१० रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक १०५९ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

या प्रकल्पांतर्गत शहरातील नदी, तलावांचे संवर्धन करणे, सौंदर्यीकरण करणे, नदी/तलावाचा परिसर पर्यटन क्षेत्र म्हणुन विकासीत करणे, पर्यटकांसाठी कॅफेटेरिया तयार करणे, बोटींगची सुविधा करणे व इतर अनुषंगीक उपांगे विकसीत करणे इत्यादी कामाचे सर्वसाधारण स्वरूप आहे. उक्त विषयास अनुसरून औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील ओव्हर (खाम) हर्सूल तलावाचा संवर्धन, विकास व सौंदर्यीकरण करणे योग्य वाटते. सदर तलावाची उभारणी सन १९५२ साली झालेली असून, सन १९८२ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेले आहे. प्राप्त अभिलेखानुसार ओव्हर (खाम) हर्सूल तलावाखालील पाणलोट क्षेत्र ६५ चौ.कि.मी. क्षेत्रात विस्तारलेले आहे. सदर तलाव शहरातील काही भागाची पाण्याची गरज काही प्रमाणात का होईना

भागवतो आहे. दरवर्षी होणाऱ्या पर्जन्यमानामुळे सदर तलाव भरून होव्हरफ्लो होतो. सदर तलावाचा सांडवा २१५ मी. लांब अशा क्षेत्रात विस्तारलेला आहे. तसेच ओव्हर (खाम) तलावाचा भाग हा राज्य महामार्गालगत असून, याच रस्त्यावर पुढे अजिंठा लेणी असल्याने पर्यटकांचा जास्त ओढा या भागाकडे असतो. त्यामुळे व केंद्र शासनाकडून अशा स्वरूपाच्या प्रकल्पासाठी मिळणारे अनुदान इत्यादी बाबी लक्षात घेता, या योजने अंतर्गत ओव्हर (खाम) तलावाचा समावेश करणे योग्य वाटते. प्रकरणी स्थळाची पाहणी या क्षेत्रातील तज्ञ व केंद्र शासनाशी संबंधी प्रकल्प संकल्पनार्थी श्रीमती पल्लवी लाटकर, संचालिका, ग्रास रूटस् रिसर्च ॲण्ड कन्सलटन्सी सर्व्हीसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांनी केली असून, त्यांनी सदर स्थळ लेक कॉन्झर्वेशन व सौंदर्यीकरणासाठी योग्य असल्याचे मत त्यांचेशी चर्चा करताना नमूद केले आहे.

त्यास्तव सदर स्थळाचा विकास करणे योग्य वाटते. वर नमूद नुसार श्रीमती लाटकर या क्षेत्रातील तज्ञ असून, त्यांनी यापूर्वी अशा स्वरूपाच्या प्रकल्पांवर उदा.माथेरान, धुळे, ठाणे व नागपुर शहराचे ठिकाणी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन कामे केलेली आहेत. त्यांनी अशा प्रकल्पांवर काम करीत असताना एक प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन स्थनिक स्वराज्य संस्था/प्राधिकरणाची कामे केली आहेत. अशा स्वरूपाची कामे करीत असतांना त्यांनी केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाशी संपर्क ठेऊन निधी मिळवून देणे बाबत मदत केलेली आहे.

औरंगाबाद शहर एक ऐतिहासिक शहर असून, जागतिक दर्जाचे एक पर्यटन केंद्र म्हणुन मान्यता पावलेले शहर आहे. या कारणाने येथे पर्यटकांचा मोठा ओढा असतो. याशिवाय आजही सदर तलाव शहराच्या पाणी पुरवठ्यात सहभाग नोंदवित असल्याने या स्थळाचा प्रथम प्राधान्याने विकास करणे आवश्यक वाटते.

त्यास्तव सदर प्रकल्पाचा एकुण आढावा घेणेसाठी उक्त नमूद प्रमाणे श्रीमती पल्लवी लाटकर यांचा प्रदीर्घ अनुभव, उपयोगीता/मदत लक्षात घेता त्यांची या प्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन नेमणूक करणे व सदरचा प्रकल्प हाती घेणेसाठी धोरणात्मक बाब म्हणून मंजूरी घेणे आवश्यक आहे.

उक्त नमूद प्रमाणे या प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे ७० टक्के अनुदान व ३० टक्के महानगरपालिकेचा सहभाग राहणार असून, प्रकल्प संकल्पनार्थीचे शुल्क एकुण प्रकल्प खर्चाच्या अंदाजे ८ टक्के राहणार आहे. करीता सदर प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, संकल्पन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत देखभाल करणे यासह श्रीमती पल्लवी लाटकर यांची प्रकल्प संकल्पनार्थी म्हणून नेमणूक करणे व प्रकल्पास धोरणात्मक बाब म्हणुन मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. तसेच या प्रकरणी येथे नमूद करण्यात येते की, शासनाने या योजने अंतर्गत मंजुर केलेल्या इतर शहरातील प्रकल्पांसाठी सेंटेज चार्जेस म्हणुन प्रकल्प खर्चाच्या ८ टक्के मंजुर केले आहे, तथापी आपल्याकडील प्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पनार्थी यांना द्यावयाचे मानधन/फी शासनाकडून मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाने हाती घेतलेल्या नॅशनल लेक कॉन्झर्वेशन प्लॅन व नॅशनल रिव्हर कॉन्झर्वेशन प्लॅन या कार्यक्रमांतर्गत ओव्हर (खाम) तलाव लेक कॉन्झर्वेशन व सौंदर्यीकरणासाठी योग्य असल्यामुळे या योजने अंतर्गतओव्हर (खाम) तलावाचा समावेश करणेस धोरणात्मक बाब म्हणून मान्यता देण्यात येते. तसेच केंद्र शासनाकडून अशा स्वरूपाच्या प्रकल्पासाठी ७० टक्के अनुदान मिळणार असल्याने सदर प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार

करणे, संकल्पन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत देखभाल करणे यासह श्रीमती पल्लवी लाटकर, संचालिका, ग्रास रूटस् रिसर्च ॲण्ड कन्सलटन्सी सर्व्हीसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांची प्रकल्प संकल्पनार्थी म्हणून नेमणूक करणेस तसेच या प्रकरणी शासनाने या योजने अंतर्गत मंजुर केलेल्या इतर शहरातील प्रकल्पांसाठी सेंटेज चार्जेस म्हणुन प्रकल्प खर्चाच्या ८ टक्के मंजुर केले असले तरी आपल्याकडील प्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पनार्थी यांना द्यावयाचे मानधन/फी शासनाकडून मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७९ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर येथील दशमेशनगर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये शेड बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,८८,४७०/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.१२,८८,४७०/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर येथील दशमेशनगर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये शेड बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,८८,४७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३८ मो.गांधीनगर, बहादुरपूरा, बापुनगर भागात १५० मी.मी. व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकणेच्या कामाचे फेरनिविदा ई-निविदा विभागामार्फत केली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस निविदा दर भरून एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | उदय इंजिनियरींग वर्क्स | अं.प.दरापेक्षा ७.८६% कमी दराने |
| २. | एल. के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ७.७८६% कमी दराने |
| ३. | सुरेश बी. सादवाणी | अं.प.दरापेक्षा ४.१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराची निविदा उदय इंजिनियरींग वर्क्स यांची आहे. उक्त निविदा दरास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याची शिफारस करण्यात येते.

करीता मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३८ मो.गांधीनगर, बहादुरपूरा, बापुनगर भागात १५० मी.मी. व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ७.८६% कमी दराची मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सन-2005 मध्ये महानगरपालिकेवर निवडुन आल्यावर स्थायी समितीमध्ये येण्याची संधी मिळाली आणि स्थायी समितीमध्ये आम्हाला जे योग्य वाटले ते

सर्व कामे करण्याचा प्रयत्न केला. पहिल्यावेळेस मा.सभापतीच्या बाजुने तर दुसऱ्यावेळेस मा.सभापती यांच्या विरोधात निवडणूक लटलो. दोन वर्ष कुठलाही वाद न करता खेळीमेळीने काम केले. स.स.श्री.अ.साजेद व त्यांचा मुलगा श्री.सिकंदर निवडुन आल्यामुळे स्थायी समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.विनायक पांडे :सन 2005 मध्ये शिवसेनेतर्फे निवडुन आलो तीन वर्ष माझ्या पक्षाने मला जी संधी दिली त्या संधीचे सोने करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. नागरिकांचे प्रश्न हिरहिरीने मांडले सोडविले. तीन सभापतींच्या काळात काम करण्याचा योग आला. स.स.श्री.अ.साजेद यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. स.स.श्री.अ.साजेद यांचे दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणुन निवडुन आल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्रीमती सफिया मोमीन :स्थायी समितीने मला दोन वर्ष सदस्य म्हणुन जी काम करण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. मा.सचिव, अधिकारी, पत्रकार बंधु आणि स.सदस्य यांचे आभार मानते. स.स.श्री.अ.साजेद आणि त्यांचे चिरंजीव महानगरपालिकेवर निवडुन आल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद